खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## ज्ञानदीप प्रकाशन

लोकमत

मस्ट READ

### पंढरीची वारी हा मानवतेचा उत्सव : बाबाजी काळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** पंढरपूरची आषाढी वारी हा मानवता, समता, बंधुता, एकतेचा संदेश देणारा सांस्कृतिक उत्सव असल्याचे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आनंदवारी (पाऊले चालती पंढरीसी...) या संकल्पनेवर आधारित असलेल्या २०२४-२५च्या ज्ञानदीप नियतकालिक प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी हभप पुरुषोत्तम महाराज पाटील, हभप बाळशिराम महाराज मिंडे, हभप पोपट महाराज राक्षे, हभप प्राजक्ता झेंडे, संस्थाध्यक्ष ॲड.देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, डॉ.शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, प्रा.विठ्ठल दौंडकर उपस्थित होते.



राजगुरू महाविद्यालयात ज्ञानदीप नियतकालिक प्रकाशन आमदार बाबाजी काळे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात ज्ञानदीप नियतकालिकाचे प्रकाशन

हभप पुरुषोत्तम महाराज पाटील म्हणाले की, संपूर्ण जगाला वारीचे कौतुक असून, वारी ही महाराष्ट्राचा लोकधर्म आहे. अज्ञानातून ज्ञानाकडे, दुःखातून सुखाकडे, अविवेकाकडून विवेकाकडे जाणारी वाट म्हणजे वारी असून, प्रत्येकाने आषाढी वारी अनुभवावी, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थाध्यक्ष ॲड.देवेंद्र बुट्टेपाटील यांनी आनंदवारी या विषयावरील ज्ञानदीप नियतकालिकाचे कौतुक केले. वारकऱ्यांसाठी जशी आनंदवारी असते, तसे प्रत्येकाने आपण जे काम करतो, ते आनंदाने करताना जीवनाची आनंदवारी करावी, असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात ज्ञानदीपचे संपादक डॉ.संजय शिंदे यांनी संत ज्ञानेश्वरांचा ७५०वा जन्मोत्सव, संत तुकारामांचा ३७५वा वैकुंठगमन सोहळ्याचे औचित्य साधून आनंदवारी (पाऊले चालती पंढरीसी...) या विषयावर वारकरी मुलाखतींवर आधारित ज्ञानदीपचा अंक तयार केल्याचे सांगितले. या कार्यक्रमात ज्ञानदीपमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्या मुलाखतकार विद्यार्थ्यांचा व वारकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

Hello Pune Gramin
Page No. 8 Feb 18, 2026
Powered by: erelego.com

# राजगुरू महाविद्यालयाच्या 'ज्ञानदीप'चे प्रकाशन

राजगुरुनगर, ता. १६ : ''विद्यार्थ्यांनी 'हे विश्वची माझे घर' असा मानवतेचा संदेश देणाऱ्या संत विचारांचा अवलंब आपल्या जीवनात करावा. राजकारण समाजकारणाला वारकरी संप्रदायाची जोड असावी. पंढरपूरची आषाढी वारी हा मानवता, समता, बंधुता, एकतेचा संदेश देणारा सांस्कृतिक उत्सव आहे,'' असे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात 'आनंदवारी' (पाऊले चालती पंढरीसी...) या संकल्पनेवर आधारित असलेल्या २०२४-२५ च्या 'ज्ञानदीप' या नियतकालिकाच्या प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी पुरुषोत्तम महाराज पाटील, बाळशिराम महाराज मिंडे, पोपट महाराज राक्षे, प्राजक्ता झेंडे, संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर आदी उपस्थित होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : ज्ञानदीप नियतकालिकाचे प्रकाशन करताना मान्यवर.

पुरुषोत्तम महाराज पाटील म्हणाले, ''संपूर्ण जगाला वारीचे कौतुक असून, वारी ही महाराष्ट्राचा लोकधर्म आहे. अज्ञानातून ज्ञानाकडे, दुःखातून सुखाकडे, अविवेकाकडून विवेकाकडे जाणारी वाट म्हणजे वारी असून प्रत्येकाने आषाढी वारी अनुभवावी.'' ''वारकऱ्यांसाठी वारी जशी आनंदवारी असते, तसे प्रत्येकाने आपण जे काम करतो, ते आनंदाने करताना जीवनाची आनंदवारी करावी,'' असे बुट्टे पाटील यांनी सांगितले.

प्रास्ताविक 'ज्ञानदीप'चे संपादक डॉ. संजय शिंदे यांनी केले. प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शिरीष पिंगळे यांनी आभार मानले.

दै. सकाळ

पुण्य नगरी

# पंढरीची वारी हा मानवतेचा उत्सव : आ. बाबाजी काळे



। राजगुरूनगर : प्रतिनिधी

पंढरपूरची आषाढी वारी हा मानवता, समता, बंधुता, एकतेचा संदेश देणारा सांस्कृतिक उत्सव असल्याचे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात 'आनंदवारी' (पाऊले चालती पंढरीसी...) या संकल्पनेवर आधारित असलेल्या २०२४-२५ च्या ज्ञानदीप नियतकालिक प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील, ह.भ.प. बाळशिराम महाराज मिंडे, ह.भ.प. पोपट महाराज राक्षे, ह.भ.प. प्राजक्ता झेंडे, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते.

आमदार बाबाजी काळे पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांनी हे विश्वची माझे घर असा मानवतेचा संदेश देणाऱ्या संत साहित्याचा अवलंब आपल्या जीवनात करावा.

राजकारण समाजकारणाला वारकरी सांप्रदायाची जोड असावी,अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

हभप पुरुषोत्तम महाराज पाटील म्हणाले की संपूर्ण जगाला वारीचे कौतुक असून वारी ही महाराष्ट्राचा लोकधर्म आहे. अज्ञानातून ज्ञानाकडे, दुःखातून सुखाकडे, अविवेकाकडून विवेकाकडे जाणारी वाट म्हणजे वारी असून प्रत्येकाने आषाढी वारी अनुभवावी, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी आनंदवारी या विषयावरील ज्ञानदीप नियतकालिकाचे कौतुक केले. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी तर आभार डॉ. शिरीष पिंगळे यांनी मानले.

Pimpri Chinchwad Edition
Feb 17, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

प्रभात

# पंढरीची वारी हा मानवतेचा उत्सव

## आमदार बाबाजी काळे : ज्ञानदीप नियतकालिकाचे प्रकाशन




**राजगुरूनगर, दि.१६ (प्रतिनिधी)** - पंढरपूरची आषाढी वारी हा मानवता, समता, बंधुता, एकतेचा संदेश देणारा सांस्कृतिक उत्सव असल्याचे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आनंदवारी (पाऊले चालती पंढरीसी..) या संकल्पनेवर आधारित असलेल्या २०२४-२५ च्या ज्ञानदीप नियतकालिक प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी हभप पुरुषोत्तम महाराज पाटील, हभप बाळशिराम महाराज मिंडे, हभप पोपट महाराज राक्षे, हभप प्राजक्ता झेंडे, संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते. काळे म्हणाले, विद्यार्थ्यांनी हे विश्वची माझे घर असा मानवतेचा संदेश देणाऱ्या संत साहित्याचा अवलंब आपल्या जीवनात करावा. राजकारण समाजकारणाला वारकरी संप्रदायाची जोड असावी अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

हभप पुरुषोत्तम महाराज पाटील म्हणाले, संपूर्ण जगाला वारीचे कौतुक असून वारी ही महाराष्ट्राचा लोकधर्म आहे. अज्ञानातून ज्ञानाकडे, दुःखातून सुखाकडे, अविवेकाकडून विवेकाकडे जाणारी वाट म्हणजे वारी असून प्रत्येकाने आषाढी वारी अनुभवावी असे आवाहन त्यांनी केले.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी आनंदवारी या विषयावरील ज्ञानदीप नियतकालिकाचे कौतुक केले. प्रास्ताविकात ज्ञानदीपचे संपादक डॉ. संजय शिंदे यांनी संत ज्ञानेश्वरांचा ७५० वा जन्मोत्सव, संत तुकारामांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळ्याचे औचित्य साधून आनंदवारी (पाऊले चालती पंढरीसी...) या विषयावर वारकरी मुलाखतींवर आधारित ज्ञानदीपचा अंक तयार केल्याचे सांगितले.

यावेळी ज्ञानदीपमध्ये मुलाखतकार विद्यार्थ्यांचा व वारकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी तर डॉ. शिरीष पिंगळे यांनी आभार मानले.

Pune Gramin Edition
Feb 17, 2026 Page No. 15
Powered by: erelego.com

केसरी

किरण खुडे (पत्रकार)

# पंढरीची वारी हा मानवतेचा उत्सव : बाबाजी काळे



**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** पंढरपूरची आषाढी वारी हा मानवता, समता, बंधुता, एकतेचा संदेश देणारा सांस्कृतिक उत्सव असल्याचे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आनंदवारी (पाऊले चालती पंढरीसी...) या संकल्पनेवर आधारित असलेल्या २०२४-२५ च्या ज्ञानदीप नियतकालिक प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी पुरुषोत्तम महाराज पाटील, बाळशिराम महाराज मिंडे, पोपट महाराज राक्षे, प्राजक्ता झेंडे, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते.

आमदार काळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी हे विश्वची माझे घर असा मानवतेचा संदेश देणाऱ्या संत साहित्याचा अवलंब आपल्या जीवनात करावा. राजकारण समाजकारणाला वारकरी संप्रदायाची जोड असावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

पुरुषोत्तम महाराज पाटील म्हणाले की, संपूर्ण जगाला वारीचे कौतुक असून वारी ही महाराष्ट्राचा लोकधर्म आहे. अज्ञानातून ज्ञानाकडे, दुःखातून सुखाकडे, अविवेकाकडून विवेकाकडे जाणारी वाट म्हणजे वारी असून प्रत्येकाने आषाढी वारी अनुभवावी असे आवाहन त्यांनी केले.



डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख